# समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८ मुंबई.

## सशस्त्र पोलीस शिपाई भरती-२०२१

## प्रेसनोट

सशस्त्र पोलीस शिपाई भरती -२०२१ शारीरिक चाचणीमधील २५६२ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र झाले आहेत.या उमेदवारांची लेखी परीक्षा **दिनांक २३/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा.रॉयल गोल्ड स्टुडियो, रॉयल पाम, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400065 (Royal Gold Studio, Royal Palm, Goregaon (East) Mumbai 400065)**या ठिकाणी घेण्यात येणार आहे.परिक्षा केंद्रावर येण्याकरीता गोरेगाव रेल्वे स्टेशन येथून बस क्र.४५२ स्टॉपचे नाव **मयुर नगर बस स्टॉप** आहे.

सदर लेखी परीक्षेस पात्र उमेदवारांनी दिनांक २३/०७/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वाजेपर्यंत वर नमुद परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे.परीक्षा सकाळी ११.०० वा.सुरू होईल. उशिरा येणाऱ्या उमेदवारांना परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

सदर लेखी परीक्षेसाठी येताना उमेदवार यांनी महाआयटी यांनी ई-मेलव्दारे पुरविलेले शारीरिक चाचणी व **लेखी परीक्षेचे ओळखपत्र डाऊनलोड करुन त्याची कलर प्रिंट आणि आवेदन अर्जावरील दोन कलर पासपोर्ट साईज फोटो तसेच या कार्यालयाकडुन मैदानी चाचणी करीता पुरविण्यात आलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.**परीक्षा केंद्रावर उमेदवारांना मोबाईल फोन, डिजीटल घडयाळ,इलेक्ट्रॉनिक वस्तु किंवा इतर तत्सम वस्तू तसेच शक्यतो कोणत्याही प्रकारच्या बॅगा आणु नये.जर उमेदवारांनी बॅगा आणल्यास त्या परीक्षा केंद्राच्या बाहेर स्वत:च्या जबाबदारीवर ठेवण्यात याव्यात. सदरच्या बॅगा व त्यातील मौल्यवान व इतर वस्तु गहाळ / चोरीस गेल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच परीक्षा केंद्रावर उमेदवांराना प्रश्नपत्रिका,उत्तरपत्रिका, काळा पेन, तसेच पॅड बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी पुरविण्यात येणार आहे.याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदरची लेखी परीक्षा नि:पक्षपातीपणे व पारदर्शकपणे पार पाडण्यात येणार आहे. उमेदवारांनी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करु नये.तसेच सदरची बाब निदर्शनास आल्यास तात्काळ भरती प्रमुखांशी संपर्क साधावा.

(प्रणय अशोक) भापसे,
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.८, मुंबई.

Scanned with OKEN Scanner